# प्रेसनोट दि.१५/०८/२०१७

# सामाजिक सुरक्षा विभागाकडुन बुधवार पेठेत छापे टाकुन वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश करुन १ अल्पवयीन व ४ सज्ञान पिडीत मुलींची सुटका

दि.१४.०८.२०१७ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेमध्ये पश्चिम बंगाल येथील एका पिडीत मुलीने तीला नोकरीच्या बहाणाने पुणे येथे आणुन बुधवार पेठ पुणे येथे वेश्याव्यवसायासाठी रुपये ४० हजार साठी तीची विक्री करुन तीचे कडुन तीचे इच्छेविरुध्द जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवुन घेवुन तीला आरोपीचे कुंटणखान्यात डांबुन ठेवले, अशा मजकुराची तक्रार कार्यालयात येवुन दिल्याने, त्यानुसार तीची तक्रार नोंदवुन फरासखाना पोलीस स्टेशनमध्ये गुरनं. १८६/२०१७ भादवि ३७०(२),३७० अ(२),३७६,३४२,१०९,३४ व इटपा ॲक्ट कलम ३,४,५,६,९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हा हा १) जमाल पुर्ण नाव माहीत नाही रा. गोपालनगर पश्चिम बंगाल २) जमालाची पत्नी ३) राजु सय्यद पुणे ४) रुपा हसन शेख ५) बाबु उर्फ पापा तन्वीर शेख ६) सागर बिल्डींगची मॅनेजर मधु, ७) वेलकम बिल्डींग मॅनेजर सुहाना ८) अनोळखी गि-हाईक याचे विरुध्द दाखल झालेला आहे. या आरोपीपैकी अ.क्र.३,४,५ यांना सामाजिक सुरक्षा विभागाच्या पथकाने तात्काळ ताब्यात घेवुन फरासखाना पोलीस स्टेशनच्या ताब्यात देवुन त्यांनी सदर आरोपी यांना अटक केली आहे. यातील फिर्यादी पिडीत मुलीस रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ताब्यात देण्यात आले आहे.

वरील मिळालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहर या विभागाकडील अधिकारी व कर्मचारी तसेच फरासखाना पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व स्टाफ यांनी संयुक्तपणे वर नमुद गुन्ह्यातील आरोपी रुपा हसन शेख व बाबु उर्फ पापा उर्फ तन्वीर शब्बीर शेख वय ३६ वर्षे यांचे कुंटणखान्यावर त्यांच्या शोधाकामी शांती बिल्डींग,बुधवार पेठ तिसरा मजला पुणे येथे छापा टाकला असता तेथुन १ अल्पवयीन मुलीची व ३ सज्ञान मुलींची सुटका करण्यात आलेली असुन त्या चारही मुली पश्चिम बंगाल राज्यातील आहेत. तथापी नमुद मुलींच्या राष्ट्रीयत्वा बद्दल पडताळणी करण्यात येणार आहे. तसेच अल्पवयीन पिडीत मुलगी व सज्ञान मुलींचे कडुन स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी त्यांना डांबुन ठेवुन वेश्याव्यवसाय करवुन घेतले प्रकरणी गुन्ह्यातील आरोपी १) रुपा हसन शेख वय २९ वर्षे २) बाबु उर्फ पापा उर्फ तन्वीर शब्बीर शेख वय ३६ वर्षे ३) राजु जफरुद्दीन शेख वय ३५ वर्षे ४) अब्दुल सलाम बद्रुउद्दीन शेख वय २७ वर्षे सर्व रा.सदर यांचे विरोधात फरासखाना पोलीस स्टेशन गुरनं १८७/२०१७ भादवि ३७०(२),३७० अ, ३७३,३७६,३६६,(अ), १०९,३४ व इटपा ॲक्ट कलम ३,४,५,६,९ सह बालकांचे लैगिंक अपराधापासुन संरक्षण अधिनियम सन २०१२ चे कलम ४,६ नुसार गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन यागुन्ह्यात आरोपी क्र.४ यास अटक करण्यात आली असुन त्याची दिनांक १८/८/२०१७ रोजी पोलीस कस्टंडी रिमांड घेण्यात आली आहे. पुढील तपास फरासखाना पोलीस स्टेशन करीत आहे. यातील पिडीत मुलीना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ताब्यात देण्यात आले आहे.

**वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री.संजय पाटील, सपोनि संपत पवार, सपोनि चंद्रकांत जाधव, प्रमोद म्हेत्रे, रमेश लोहकरे, संजय गिरमे, नितिन तेलंगे, नामदेव शेलार, प्रदिप शेलार, सचिन कदम, राजेद्र कचरे, राजेश उंबरे, संदीप गायकवाड, सचिन शिंदे, नितिन लोंढे, महिला कर्मचारी ननिता येळे, गितांजली जाधव, सरस्वती कांगणे, यांनी फरासखाना पोलीस स्टेशनचे वपोनि श्री.अंबुरे व पोनि( गुन्हे) श्री.चव्हाण यांचे मदतीने केलेली आहे.**